# बीड जिल्ह्यातील जलप्रणाली: एक भौगोलिक अध्ययन

**डॉ. टेकाडे एम.एस.**
भूगोल विभाग
आनंदराव धोंडे महाविद्यालय,
कडा, ता.आष्टी, जि.बीड

**प्रस्तावना:**

नद्यांचे प्रवाह म्हणजे कोणत्याही देशांच्या किंवा विभागाच्या धमन्या किंवा रक्तवाहिन्या असतात. तसेच पाणी म्हणजे जीवन असे अनेक ऋषीमुनींनी व शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. नद्यांचा उपयोग जलसिंचन, औद्योगिकीकरण पिण्याच्या पाण्यासाठी, वीजनिर्मीती, वाहतूक तसेच खेडयातील लोकांचे जीवन समृद्ध करण्यासाठी होतो. बीड जिल्ह्यात गोदावरी मांजरा व सिना या मुख्य नद्या आहेत तर कुंडलिका, सिंदफणा, वाण, मिखाटी, कांगळी, कडी, लेंडी, अमृता, बिंदूसरा, सरस्वती, गुणवती, रेना, केज, लिंबा, चौसाळा, वांगी, होळ, चंदनसावरगांव, बोकडी, केळी, तलवार, इंचना, बाभती, येलबची इ. नद्या आहेत.

**बीड जिल्ह्यातील जलप्रणाली:**

**१) गोदावरी जलप्रणाली :-**

गोदावरी नदीचा उगम नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर या ठिकाणी झालेला असून ती ईशान्येकडून आग्नेयकडे वाहते. या नदीचा बीड जिल्यात प्रवेश गेवराई तालुक्यातील कुरणपिंपरी या ठिकाणी होतो तर परळी तालुक्यातील वासनगांव या ठिकाणी नदी जिल्ह्याच्या बाहेर प्रवेश करते. गोदावरी बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी व प्रमुख नदी आहे. ही नदी जिल्ह्याच्या उत्तर सिमेवरुन साधारणत: वायव्येकडून आग्नेयकडे वाहते. गोदावरी नदीने बीड-औरंगाबाद, बीड-जालना व बीड-परभणी या जिल्ह्याच्या सिमा निश्चीत केल्या आहेत.

गोदावरी नदी गेवराई, माजलगांव व परळी तालुक्यातून वाहते या नदीने वाहून आणलेल्या गाळाच्या संचयनामुळे नदी काठावर काही ठिकाणी १५ मी जाडीचा काळया मातीचा थर असुन या मातीच्या थराची सरसरी जाडी १० मी आहे. यामुळे या नदीकाठचा भाग सुपीक आहे. लेंडी, अमृता, सरस्वती, गुणवती व वाण या गोदावरी नदीच्या प्रमुख उपनद्या आहेत. या उपनद्यांची सर्वसाधारण दिशा वायव्य आग्नेय ईशान्य व नैऋत्य अशी आहे या उपनद्यामुळे गोदावरी जलप्रणाली जाळीदार स्वरुपाची तयार खाली असून या खोऱ्यातील लोकांचे जीवन सुखी व समृद्ध करण्यामध्ये या नदीचा वाटा मोठा आहे.

**उपनद्या :**

**लेंडी नदी :**

लेंडी नदीचा उगम गेवराई तालुक्यातील चकलंबा गावाच्या नैऋत्येला डोंगर रांगातून झाला आहे. ही नदी उगमापासून उत्तरेकडे व नंतर पूर्वेकडे वाहत पूढे ही नदी बीड जिल्ह्याच्या सीमेपासून २ किलोमीटर अंतरावरुन वाहते व नंतर ती गोदावरी नदीला मिळते.

**अमृता :**

अमृता नदीचा उगम गेवराई तालुक्यात उमापुरच्या पूर्वेस डोंगर रांगातून होतो. ही नदी उगमापासून सामान्यतईशान्य दिशेला धोंडराई गावाकडे वहात जाते व नंतर सावळेश्वर या ठिकाणी गोदावरी नदीस मिळते.

**सरस्वती :**

सरस्वती व गुणती नद्यांचे उगमस्थान एकमेकांच्या फार जवळ आहे. सरस्वती नदीचा उगम धारुर तालुक्यातील बालाघाट डोंगर रांगात होतो. ही नदी उगमापासून उत्तरेस हिंगणी दिंद्रुड पासून वाहते. बेलूर नंतर पूर्वेस वाहते व गोदावरीस मिळते.

**गुणवती :**

या नदीचा उगम धारुर तालुक्यात बालाघाट डोंगर रांगात होतो. ही नदी उगमापासून वडवणी तालूक्यातील हिवरा गावापर्यंत ईशान्य दिशेस वाहते, गोदावरी व सरस्वती संगमाच्या १.५ किमी. खालील भागात गोदावरीला मिळते.

**वाण :**

वाण या उपनदीस वानगंगा असेही म्हणतात. या नदीचा उगम धारुरच्या दक्षिण दिशेस होतो. बालाघाट पठारावर ही नदी पूर्व व आग्नेय दिशेला वाहते. अंबाजोगाईच्या वायव्येस ही नदी वळण घेवून उत्तरेस वाहते. नंतर ईशान्ये दिशेकडे वाहते व गोदावरीस मिळते. अंबाजोगाई येथे जयंतीमाला ही नदी वाण नदीस मिळते. वाण नदी प्रवाह उगमक्षेत्रात रेणानदीपेक्षा क्षरणाचे कार्य प्रभावीपणे करतो. त्यामुळे वाण प्रवाह रेणा नदीतील पाण्याचे अपहरण करतो. वाण नदीचे पाणलोट क्षेत्र ३७२ चौकिमी आहे.

**सिंदफणा नदी :**

सिंदफणा नदीचा उगम बालाघाट पठारावर चिंचोली टेकडयांच्या वायव्य भागात होतो उगमानंतर ही नदी अंमळनेरकडे वाहत जाते. एक कि.मी. नंतर चवारवाडी येथे उजवीकडे वाहते. हिंगलवाडी येथे गणा ही नदी वायव्य दिशेकडून वाहत येवून सिंदफणेस मिळते. सिंदफणा व बेलपर नद्यांच्या संगमानंतर किन्ही ही नदी सिंदफणेला मिळते. नंतर सिंदफणा माजलगांव पर्यंत पूर्वेकडे बरेचसे अंतर वाहत जाते व नंतर ही नदी ईशान्य व उत्तर दिशेला वाहत जावून गोदावरी क्षेत्र मंजरथ या ठिकाणी मिळते.

कोटण, बेलपर व किन्हा या सिंदफणाला डाव्या किनाऱ्यावर मिळणाऱ्या महत्वाच्या उपनद्या आहेत. कोटन नदीचा उगम चिंचोली टेकडयाच्या दक्षिण उतारावर झाला. ही नदी ईशान्यकडे वाहत जावून हिंगलवाडीच्या खालील भागात सिंदफणेस मिळते बेलपर नदीचा उगम चिंचोली टेकडयाच्या उत्तर उतारावर होतो ही नदी हातोल्याच्या अगोदर अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश करुन काही अंतर जिल्ह्यात वाहते व नंतर बीड जिल्ह्यात प्रवेश करुन पिंपळनेरकडे वाहते व गोमाळवाडा येथे सिंदफणेला मिळते. किन्ही नदीचा उगम पांगरीच्या पश्चिमेकडील डोंगरातून होतो. ही नदी उगमापासून पूर्वकडे आणि ईशान्यकडे वाहते. ही नदी पुढे वाहत जाऊन लिंबगावच्या वरील भागात सिंदफणा नदीस मिळते.

सिंदफणा नदीच्या उजव्या किनाऱ्यावर अनेक उपनद्या बालाघाट डोंगर उतारावरुन येवून मिळतात. उथोला, उतावली, डोमरी, ताकुर, पिंपळनेर, बिंदूसरा , आणि कुंडलिका उजव्या किनाऱ्यावर येवून

सिंदफणाला मिळणाऱ्या या उपनद्या आहेत. यात बिंदूसरा व कुंडलिका या जास्त महत्वाच्या, विस्ताराच्या व लांबीच्या आहेत. उथोला ही नदी पश्चिम-पूर्व दिशेने रायमोहाकडे उतावळी नदी खोकरमोहा आणि खालापूरीकडे डोमरी ही राजूरीकडे वाहते. डोमरी नदी सिरसमार्ग जवळ सिंदफणेला मिळते.ताकूर नदीचा उगम पिंपळगाव घाट टेकडयाच्या पूर्व उतारावर झाला आहे.

**बिंदुसरा:-**

बिंदूसरा नदीचा उगम बीड तालुक्यातील बालाघाट डोंगररागांत वाघेरा या ठिकाणी होतो. हे ठिकाण लिंबागणेशच्या वायव्य दिशेला २ किमी अंतरावर आहे. ही नदी उगमापासून बालाघाट पठाराच्या उत्तर उत्तराला अनुसरुन वाहते. सुरुवातीस उत्तरेस वाहते. कदमवाडी नंतर पालीपर्यंत पूर्व दिशेला वाहते. पालीपर्यंत या नदीला अनेक जलप्रवाह मिळतात. बिंदूसरा नदीचे पाणलोट क्षेत्र १८३ चौ.कि.मी. किंवा ७०.७५ चौ. मैल आहे. या नदीवर पाली या ठिकाणी बिंदुसरा प्रकल्प आहे, पालीपासून ८ किमी अंतरावर बीड शहर असून या शहराच्या मध्यभागातून ही नदी वाहते ही नदी बीडपासून उत्तरेस व नंतर ईशान्यकडे वाहत जावून सिंदफणास मिळते.

**कुंडलिका -**

कुंडलिका ही नदी कुंडका या नावाने सुद्धा ओळखतात. या नदीचा उगम नेकनूरच्या ईशान्य दिशेला होतो. सुरुवातीस ही नदी ईशान्यदिशेला वाहते व नंतर पूर्व दिशेला नागझरी पर्यंत वाहते व नंतर साधारणत: उत्तर दिशेस वाहत जावून माजलगांवापासून काही अंतरावर सिंदफणा नदीस मिळते.

**ब) मांजरा नदीप्रणाली:-**

मांजरा नदीला वांजरा म्हणून ओळखले जाते. या नदीचा उगम पाटोदा तालुक्यातील गोवळवाडी च्या उत्तरेस बालाघाट डोंगररांगात होतो. ही नदी सुरुवातीस दक्षिणेस व बालाघाट पठार ओलांडल्यानंतर आग्नेय दिशेस वाहते. व नंतर उजवीकडे वळण घेवून वाहते. या वळणानंतर साकत ही नदी मांजरा नदीला मिळते. ही पुढे पाटोदयापर्यंत वाहत गेल्यानंतर परत आग्नेय दिशेस वाहते. पिंपळगांवघाट नंतर मांजरा नागमोडी वळणाने वाहते. नंतर बीड जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरुन पश्चिमेकडून-पूर्वककडे बऱ्याच प्रमाणात गोदावरी नदीला समांतर वाहते. मांजरा नदीमुळे जिल्ह्याची नैसर्गिक दक्षिण सिमा तयार झाली आहे. या नदीने बीड-अहमदनगर, बीड-उस्मानाबाद व बीड-लातूर अशा जिल्ह्याच्या नैसर्गिक सिमा निश्चित केल्या आहेत. मांजरा नदीचे पात्र बीड जिल्ह्यात खोल असून पात्राची जास्तीत जास्त खोली ९ मी असून सरासरी खोली ५.५ मी एवढी आहे. ही नदी बीड जिल्ह्यातील पाटोदा, बीड, केज व अंबाजोगाई तालूक्यातून वाहते. येथे जलसिंचन प्रकल्प उभारण्यात आला आहे. चौसाळा, लिंबागणेश, यळंबची (वाघी), बाभती, केज, होळ, रेणा व चंदन सावरगांव या मांजरा नदीच्या उपनद्या आहेत.

**चौसाळा :**

चौसाळा नदीचा उगम बीड तालुक्यातील लिंबागणेशच्या पश्चिम दिशेस होतो. ही नदी उगम स्थानापासून आग्नेयस बोरखेड, चौसाळा हिंगणीपर्यंत वाहत जाते व शेवटी मांजरा नदीस मिळते. ही नदी चौसाळ्याच्या दक्षिणेस बीड, उस्मानाबाद राष्ट्रीय महामार्गावरील पुलाजवळ वळण घेते व दक्षिणेकडे वळते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**बाभती :**

बाभती किंवा सणवी ही नदी विडा, आरणगांव व वरपगांव या गावाजवळून वाहते व नंतर आग्नेय दिशेस वाहते. या नदीला सुरुवातीस सिंधी व म्हसाजोगी नंतर येवता व जवळा हे प्रवाह मिळतात.

**रेणा :**

रेणा नदीचा उगम अंबाजोगाईच्या दक्षिणेस होतो. ही मांजरा नदीची सर्वात लांब व मोठी उपनदी आहे. ही नदी सुरुवातीस पूर्वेस वाहते व नंतर आग्नेय दिशेस वाहते व शेवटी रेणापूरपासून दक्षिण दिशेस वाहत जावून भातांगळीजवळ मांजरा नदीस मिळते.

**क) सिना जलप्रणाली**

सिना नदी जिल्ह्यातील प्रमुख महत्वाची नदी असून या नदीचा उगम अहमदनगर जिल्ह्यात झाला आहे. सीना हे नांव तीन लहान मुख्य प्रवाहाला दिले आहे यापैकी एक प्रवाह अहमदनगरच्या पश्चिमेस जामगांव येथे उगम पावतो आणि दुसरे दोन प्रवाह अहमदनगरच्या पूर्वेकडील टेकडयात जेऊर व पिंपळगांव उजणीच्या खालील भागात उगम पावतात. या मुख्य तीन प्रवाहाद्वारे निर्माण झालेली सिना नदी सुरुवातीस दक्षिणेस व नंतर आग्नेय दिशेस बालाघाट पठाराच्या समांतर बाजून वाहते.बीड व अहमदनगर जिल्ह्याची नैसर्गिक सिमा तयार करते. सिना नदी आष्टी तालुक्यातून वाहते सिना ही भिमा नदीची महत्वाची उपनदी आहे.

**तलवार :**

तलवार ही सिंना नदीची उपनदी असून या नदीचा उगम बीड पठाराच्या पश्चिम उतारावर होतो. ही नदी ब्राम्हगणगांव व आष्टीपासून वाहत जाऊन खडकतच्या वरील भागात सिना नदीला मिळते.

**विंचरना:**

विंचरना ही नदी सिना नदीची उपनदी असून या नदीचा उगम बीड पठाराच्या पश्चिम टोकाकडे चिंचोली गावाच्या दक्षिणेस होतो व पठाराच्या पश्चिम दिशेस चिखली अंतापूर आणि लांबवाडी पर्यंत वाहत जाते. ही नदी सौताडयाच्या पश्चिमेस दक्षिकडे वाहते या वळणावर नदी पात्र उभ्या कडयासारखे असून येथे धबधब्याची निर्मीती झाली आहे. धबधब्याच्या खालील भागात या नदीने तीव्र उताराच्या कडयाची अरुंद व खोल दरीची निर्मीती केली आहे. दरीच्या कडयावरील खडकाचे थर लाव्हा खडकाचे आहे. धबधब्यामुळे नदीचे पात्र व नदीची कड तुटल्यामुळे नदीपात्र मागे मागे सरकत आहे. त्यामुळे अरुंद दरीचा विस्तार व लांबी वाढत आहे सौताडयापासून काही अंतरावर ही नदी अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश करते व नंतर सिना नदीला मिळते.

**३) मेहकरी नदी :-**

मेहकरी ही सिना नदीची उपनदी असून या नदीचा उगम सिना नदी उगम क्षेत्रातील टेकडयांच्या दक्षिण उतारावर होतो. मेहकरी नदीचे उगमस्थान सिना नदीचे पुर्वेकडील जे दोन मुख्य प्रवाह आहेत त्यांच्या उगमक्षेत्रात आहे. उगमस्थानापासून काही अंतरानंतर ती अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश करुन बरेच अंतर वहात गेल्यानंतर नांदुरच्या वरील भागात २ किमी. अंतरावर बीड जिल्ह्यात प्रवेश करते. या नदीचा बीड जिल्ह्यातील प्रवाहमार्ग लांब व विस्तारीत असुन याची दिशा दक्षिण व अग्नेय अशी आहे.ही नदी सांगवी येथे

सिना नदीस मिळते. मेहकरीच्या पश्चिम व पूर्व तीरावर काही लहान-मोठे जलप्रवाह येवून मिळतात.या प्रवाहात केली, कंबली, केरी, करी व बोकडी हे महत्वाचे प्रवाह आहेत.

**अ) केळ:-**

केळ या नदीचा उगम आष्टी तालुक्याच्या वायव्य भागात होतो. ही नदी जिल्ह्यातील सर्वांत उंच भागातून वाहत जाते व नंतर पिंपळगांव घाट आणि दौलावडगावपासून दक्षिणेस वाहते व पूढे मेहकरी नदीला मिळते.

**ब) कंबली:-**

कंबलीचा उगम बालाघाट डोंगरराच्या दक्षिण उतारावर सावरगांवच्या वरील भागात होतो व नंतर ही नदी दक्षिण व नैऋत्य दिशेस गहूखेल, हिवरा, पिंपरखेड, धानोरा व टाकळी या गावाजवळून वाहते व ती मेहकरीला मिळते.

**ड) कडी :-**

कडीनदीचा उगम कांबळी नदीच्या उगमक्षेत्राच्या पूर्वेस त्याच टेकडयात नगर जिल्ह्यात होतो.ही नदी दक्षिणेस वाहत जाऊन कडी नदीस मिळते. तसेच उत्तरेकडील ही आणखी एक नदी कडी नदीस मिळते. कडी नदी चिंचोली पठारावरुन वाहते व नंतर देवी निंबगाव व कडा येथून आग्नेय दिशेने वाहते. कडयानंतर दक्षिणेस ही नदी चोभानिंबगांव येथे मिळते. पुढे धिरडी येथे कडी नदी मेहकरी नदीस जाऊन मिळते. या सर्व नद्या सिना नदीच्या उपनद्या आहेत.

**इ) बोकडी:-**

बोकडी नदी चिंचोली पठाराच्या पश्चिम उतारावरुन जळगांवपर्यंत नैऋत्य दिशेस वाहते व नंतर दक्षिणेस वहात जावून सिना व मेहकरी नदीच्या संगमाच्या वरील भागात काही अंतरावर मेहकरीस मिळते. मेहकरी, तलवार व इंचना या नद्याशिवाय अनेक लहान-लहान नद्या बीड जिल्यात सिना नदीस मिळतात. यात खालकी व लोणी नाला या महत्वाच्या व मोठया आकाराच्या नद्या आहेत.

**संदर्भ:**


१) बीड जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, १९९१, २००१, २०१५.
२) बीड जिल्हा - गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई
३) डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ शहापूरकर: वस्ती भूगोल, विदयाभारती प्रकाशन, लातूर.
४) डॉ. दाते व सौ दाते: प्राकृतिक भूगोल, विदया प्रकाशन, नागपुर
५) प्रा. डॉ. जगदिश सिंह : संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.